सं.फौ.प्र.क्र.६५/२०२२

सरकार वि.महादेव शिंदे

निशाणी क्रमांकः २१.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक्र ०१ यांची साक्ष शपथेवर सुरु –**

माझे नावः अंबादास अशोक कचरे,

वयः ४० वर्ष, धंदाः शेती,

राहणारः पाडळी, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे विव्दान सहा. सरकारी वकील**
**श्री. ए. बी. विधाटे यांच्या मार्फत–**

**१.** दिलीप अशोक कचरे हा माझा भाउ होता. दि. १९.०३.२०२१ रोजी माझा भाउ दिलीप हा जे. सी. बी ने काम करुन परत येत असताना वृध्देश्वर साखर सहकारी कारखान्याजवळ वृध्देश्वर अर्बन बँकेजवळ त्याला ट्रॅक्टरने धडक दिली होती. माझा भाउ मोटारसायकल क्र. एम एच १६ ए एफ १८३५ वरुन रात्री ८.३० वा. चे सुमारास येत होता. मला त्यावेळी सुनिल हरिभाउ कचरे यांनी फोनवरुन अपघाताची माहिती दिली होती. मी साधारण १० मिनीटांमध्ये अपघाताच्या ठिकाणी पोहोचलो. माझा भाउ त्यावेळी रस्त्याच्या कडेला पडला होता व त्याच्या डोक्यातून रक्त येत होते व त्याची मोटारसायकल रस्त्याच्या कडेला पडलेली होती. सदर ट्रॅक्टर तिथे नव्हता. सदर ट्रॅक्टरचा क्र एम एच १६ बी एम ३३६० असा होता. सदर चालकाचे नाव महादेव भाउसाहेब शिंदे असे होते. मी भावाला उपचारासाठी अहमदनगर येथील नोबेल हॉस्पीटल येथे दाखल केले होते. माझ्या भावाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर भावाला उत्तरीय तपासणीकरीता सिव्हील हॉस्पीटल अहमदनगर येथे घेवून गेलो. भावाच्या अंत्यविधीनंतर व तेरावा झाल्यानंतर मी सदर घटनेची फिर्याद दिली. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच असुन त्यातील मजकुर बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. सदर फिर्यादीस **निशाणी–२२** देण्यात येते. आता मला दाखविणेत

आलेले मोटारसायकलचे फोटो तेच आहेत. सदर **फोटोंना एकत्रित आर्टीकल–अ** देण्यात येते.

**<u>सरतपास पुर्ण</u>**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विव्दान वकील श्री. जे. टी. बटुळे यांच्या मार्फत–</u>**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, अशोक सुखदेव नाबधे हे माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शेषराव सुर्यभान कचरे, सागर कचरे व आश्वीनी कचरे हे माझ्या भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे आहे की,आमचे गाव ते वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना हे अंतर साधारण ४ किमी आहे. हे म्हणणे खरे नाही की,वृध्देश्वर अर्बन बँक ही वृध्देश्वर सहकारी साखर कारखान्याच्या आवारातच आहेत. हे म्हणणे खरे नाही की, बँकेच्या रोडलगत दोन हॉटेल व वृध्देश्वर देवस्थान मंदीर आहे. हे म्हणणे खरे आहे की,तेथून एक रस्ता पिंपळगावकडे आणि दुसरा रस्ता तिसगावकडे जातो. हे म्हणणे खरे आहे की,बँकेसमोरून जाणारा मार्ग हा राज्यमार्ग आहे. हे म्हणणे खरे आहे की,अपघाताच्या ठिकाणी कायम वर्दळ असते.

३. हे म्हणणे खरे नाही की,अपघाताच्या ठिकाणापासून कारखान्यामध्ये जाणारा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की,अपघाताची नुकसान भरपाई मिळणेकरीता आम्ही अहमदनगर येथील अपघात न्यायाधिकरणाकडे दावा दाखल केला होता. सदर अपघाताची नुकसान भरपाई आम्हाला मिळाली आहे. हे म्हणणे खरे नाही की,मी सांगत असल्याप्रमाणे माझ्या भावाचा अपघात झाला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीविरुध्द खोटी केस दाखल केली आहे.

**४.** हे म्हणणे खरे आहे की,शेषराव कचरे हे आमच्या भावकीतील व गावचे सरपंच आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचा जावई पोलिस निरीक्षक आहेत.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, दि. १९.०३.२०२१ रोजी माझा भाउ दिलीप हा जे.

सी. बी ने काम करुन परत येत असताना वृध्देश्वर साखर सहकारी कारखान्याजवळ वृध्देश्वर अर्बन बँकेजवळ त्याला ट्रॅक्टरने धडक दिली होती, माझा भाउ मोटारसायकल क्र. एम एच १६ ए एफ १८३५ वरुन रात्री ८.३० वा. चे सुमारास येत होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला त्यावेळी सुनिल हरिभाउ कचरे यांनी फोनवरुन अपघाताची माहिती दिली होती, मी साधारण १० मिनीटांमध्ये अपघाताच्या ठिकाणी पोहोचलो, माझा भाउ त्यावेळी रस्त्याच्या कडेला पडला होता व त्याच्या डोक्यातून रक्त येत होते व त्याची मोटारसायकल रस्त्याच्या कडेला पडलेली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर ट्रॅक्टरचा क्र एम एच १६ बी एम ३३६० असा होता, सदर चालकाचे नाव महादेव भाउसाहेब शिंदे असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
DN: c=IN, o=BOMBAY HIGH COURT, 2.5.4.20=27258b50725b8ad0f02b93c79864217287a311295d93b8bfdb3e0b1ef7505488, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950294, postalCode=400001, st=Maharashtra, serialNumber=a141e942a1599350c9e218a76b562e7b4a7f83f2030ebfe78fa3c19c2f168be2, cn=SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
Date: 2026.03.09 17:40:24 +05'30'

**दिनांकः ०९/०३/२०२६.** **(शिरीषकुमार दि. वाघमारे )**
**पाथर्डी.** **प्र. वर्ग न्यायदंडाधिकारी, पाथर्डी. न्या. क्र.०२**